


दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA




vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● बुधवार १३ मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २१० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर तलाठी भरतीमध्ये मोठी अपडेट




पुणे : तलाठी भरतीसाठी टीसीएस कंपनीकडून परीक्षा घेण्यात आली होती. परीक्षेतील प्रश्नांबाबत आक्षेप घेण्यात आले होते. या आक्षेपांवर केलेल्या कार्यवाहीच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठामध्ये याचिका दाखल करण्यात आली होती. त्यावर सुनावणी होऊन याचिकाकर्त्याने सादर केलेल्या निवेदनातील तक्रारींचे निवारण करण्याचा आदेश उच्च न्यायालयाने १३ फेब्रुवारीला दिला.

तलाठी भरती परीक्षा एकूण ५७ सत्रांमध्ये १७ ऑगस्ट २०२३ ते १४ सप्टेंबर २०२३ या कालावधीत घेण्यात आली होती. परीक्षा झाल्यानंतर टीसीएस कंपनीकडून २८ सप्टेंबर २०२३ ते ८ ऑक्टोबर या कालावधीत प्रश्न / उत्तरांबाबत प्राप्त आक्षेपांचे पुन्हा पुनर्विलोकन करण्यात आले आहे. त्यानुसार टीसीएस कंपनीकडून ७९ प्रश्नांमध्ये उत्तरसूची / प्रश्न यांबाबत घेतलेले आक्षेप बरोबर असल्याचे मान्य करण्यात आले आहे. त्यानुसार आता प्रश्नोत्तर तालिकेतील एकूण २१९ प्रश्नांमध्ये / त्यांच्या उत्तर सूचीत बदल करण्यात येत आहे. एकूण ३९ प्रश्नांचे पर्याय नव्याने दुरुस्त करण्यात आले आहेत.

तसेच १८० प्रश्नांचे संपूर्ण गुण त्या सत्रातील विद्यार्थ्यांना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार उमेदवारांच्या "लॉगइन" खात्यात योग्य ती सुधारणा करण्यात येत आहे. तसेच प्रश्ननिहाय दुरुस्ती भूमी अभिलेख विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. या २१९ प्रश्नांतील बदलानुसार गुणवत्ता यादी मध्ये बदल झाला आहे. त्यानुसार ३६ जिल्ह्यांच्या जिल्हानिहाय सुधारित गुणवत्ता याद्या प्रसिद्ध करण्यात येत आहेत. तलाठी भरती परीक्षा देणाऱ्या काही उमेदवारांचे निकाल राखून ठेवण्यात येत असून त्यांची जिल्हा निहाय यादी प्रसिद्ध करण्यात येत आहे, असे प्रभारी राज्य परीक्षा समन्वयक तथा अप्पर जमाबंदी आयुक्त सरिता नरके यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटले आहे.

## मुक बधीर विद्यार्थ्यांसमवेत कामगार नेते सुरेश पाटील यांचा वाढदिवस साजरा.

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**

भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री,कामगार नेते सुरेश पाटील यांचा वाढदिवस मुक बधीर विद्यार्थी यांच्या समवेत पंढरपूर येथे साजरा करण्यात आला.भारतीय मजदूर संघाचे त्रिवार्षिक अधिवेशन पंढरपूर येथे आयोजित केले होते या अधिवेशनाच्या आयोजनासाठी सुरेश पाटील हे पंढरपूर येथे आपल्या वाढदिवसाच्या दिवशी उपस्थित होते.त्या निमित्ताने त्यांनी पंढरपूरच्या पांडुरंगाचे दर्शन घेऊन पंढरपूर येथील वै.रखुमाबई भीमराव शिंदे या मूकबधिर वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना आपल्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक




साहित्याचे वाटप व रोख रक्कम देणगी म्हणून दिली. सुरेश पाटील हे श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग जासई या शाळेचे शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष असून ते या विद्यालयात शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी वही व पेन भेट वस्तू देऊन विद्यार्थ्यांचा वाढदिवस शाळेत साजरा करतात.या कार्यक्रमात रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नुरा शेख, डी.पी सोनवणे, मधुकर पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.त्यांच्या या सेवाभावी व स्तुत्य उपक्रमाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## माढा तालुका आदर्श शिक्षक रणजीत शेळके व माढा तालुका अंगणवाडी मदतनीस अलका ढेरे यांचा सन्मान.



**दैनिक वादळ वार्तासोलापूर/विश्वास चोपडे**

कव्हे येथील श्री रणजीत देविदास शेळके जि प प्रा केंद्र शाळा कव्हे येथील शिक्षक यांना जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल दिनांक ११/०३/२०२४ रोजी जि प प्रा केंद्र शाळा कव्हे शालेय समिती अध्यक्ष सचिव व सदस्य यांनी त्यांचा शाल श्रीफळ व गुच्छ देऊन सन्मानित केले.

त्याचप्रमाणे कव्हे ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सदस्य यांच्याकडून श्री रणजीत देविदास शेळके यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल व सौ.अलका सतीश ढेरे यांना माढा तालुका आदर्श अंगणवाडी मदतनीस म्हणून पुरस्कार मिळाल्याबद्दल शाल श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.

## पोलीस पाटील पदी निवड झाल्याबद्दल शिवाजी बाळासाहेब चोपडे (पाटील) यांचा सन्मान

**दैनिक वादळ वार्ता**
**सोलापूर/विश्वास चोपडे**

कुर्डूवाडी उपविभागीय माढा तालुक्यातील बऱ्याच गावांच्या पोलीस पाटील पदाची निवड प्रक्रिया दिनांक ११/०३/२०२४ रोजी पार पडली. सदरील निवड प्रक्रियेत कव्हे गावचे पोलीस पाटील पद हे रिक्त होते या पदासाठी गावातून १६ अर्ज दाखल झाले होते. त्यापैकी १३ उमेदवार हे लेखी परीक्षेत पात्र झाले होते. तर फक्त एक उमेदवार शिवाजी बाळासाहेब चोपडे हे मुलाखतीत पात्र झाले त्यामुळे उपविभागीय अधिकारी प्रियंका आंबेकर यांनी शिवाजी बाळासाहेब चोपडे यांची मुलाखत घेऊन कव्हे गावच्या पोलीस पाटील पदी श्री शिवाजी बाळासाहेब चोपडे यांची गुणानुक्रमे निवड करण्यात निवड करण्यात आल्याची निवड यादी जाहीर केली आहे. परिश्रम केल्यानंतर यश मिळते यश मिळवल्यानंतर आनंद मिळतो परिश्रम तर सगळेच करतात परंतु यश हे त्यांनाच मिळते जे कठोर परिश्रम करतात. शिवाजी बाळासाहेब चोपडे (पाटील )यांची कव्हे



पोलीस पाटील पदी निवड झाल्याबद्दल ग्रामपंचायत कव्हे सरपंच उपसरपंच सदस्य व ग्रामस्थांकडून सत्कार करण्यात आला. शिवाजी चोपडे (पाटील )यांनी प्रथम श्री सिद्धेश्वर ग्रामदेवताचे दर्शन घेतले.

या निवडीबद्दल गावातील नागरिकांनी व मित्र नातेवाईक यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## लोकसभा निवडणूक

### श्रीकांत शिंदे यांची नाशिकमध्ये मोठी घोषणा, भाजपला मान्य असणार?



नाशिकमधून एक मोठी बातमी समोर आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव खासदार श्रीकांत शिंदे यांच्याकडून नाशिकमध्ये मोठी घोषणा करण्यात आली आहे. एकनाथ शिंदे यांच्याकडून नाशिकमध्ये खासदार हेमंड गोडसे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. प्रभू रामाचा धनुष्यबाण नाशिकमध्येच राहणार, असं श्रीकांत शिंदे यांनी म्हटलं आहे. हेमंत गोडसे यांना तिसऱ्यांदा लोकसभेत पाठवायचं आहे, असं श्रीकांत शिंदे म्हणाले आहेत. नाशिकमध्ये आज कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याला श्रीकांत शिंदे यांनी उपस्थितीत लावली. या कार्यक्रमात श्रीकांत शिंदे यांनी हेमंत गोडसे यांची नाशिक लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारी जाहीर केली.

### महाविकास आघाडीत वंचितवरुन काय घडतय?



प्रकाश आंबेडकर वारंवार म्हणतायत की, महाविकास आघाडीत 15 जागांवर वाद आहे...त्याच वेळी जागा वाटपावरुन संजय राऊतांना खोटं बोलत असल्याचं सांगून आंबेडकरांनी राऊतांवर निशाणा साधला. आम्ही महाविकास आघाडीकडून वंचितला आंबेडकरांना हव्या 4 जागांचा प्रस्ताव दिल्याचं राऊत म्हणतायत. तर जागा वाटपासाठी आम्ही मविआसोबत बसतो. मला असं सांगण्यात आलं की बाळासाहेब थोरात तुमच्याशी चर्चा करतील. अद्याप त्यांनी संपर्क साधलेला नाही पण आशा आहे की चर्चेसाठी बाळासाहेब थोरात तारीख ठरवतील जेणे करुन काँग्रेस आणि वंचित आघाडी दोघे मिळून भाजप-संघाला उद्धवस्त करण्यासाठी पुढे जातील.

### वसंत मोरे यांनी राज ठाकरेंना का सोडलं? मनसे नेत्याकडून बुटाचा फोटो पोस्ट



वसंत मोरे पुण्यातून लोकसभा लढण्यास इच्छुक आहेत. आपली इच्छा त्यांनी राज ठाकरेपर्यंत बोलूनही दाखवली. मात्र पुण्यातल्या कार्यकारिणीतल्याच नेत्यांनी कटकारस्थान करुन निगेटिव्ह अहवाल राज ठाकरेंपर्यंत पोहोचवला. बोलण्यासाठी वेळ मागूनही राज ठाकरेंनी वेळ दिली नाही अशी खंतही मोरेंनी बोलवून दाखवली.वसंत मोरे मनसेत राहणार नाहीत हे ना कोणाकडे तक्रार करतो. ना कोणाकडून अपेक्षा ठेवतो. त्यानंतर ट्विटरवरुन कार्यालयातील राज ठाकरेंच्या फोटोसमोर साष्टांग दडवंत घालणारा फोटो ट्विट करुन, अखेरचा जय महाराष्ट्र. साहेब मला माफ करा असं म्हणून मनसेतून राजीनामा जाहीर केला. मोरे लोकसभा लढवण्यासाठी इच्छुक होते.

# दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून गेवराई तालुक्यात तात्काळ उपाय योजना करा

## शिवसेने उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची मागणी

वादळवार्ता/गेवराई

गेवराई तालुक्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, आजच गावांतील ग्रामस्थांना प्यायला पाणी नाही. जनावरांचेही मोठे हाल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तात्काळ उपाययोजना कराव्यात अशी मागणी गेवराई शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, तालुकाप्रमुख अजय दाभाडे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

गेवराई तहसीलदारांना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने माजी राज्यमंत्री बदामराव पंडित तालुकाप्रमुख अजय दाभाडे यांनी दिनांक १२ मार्च २०२४ रोजी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दरवर्षीच्या तुलनेत गेल्या वर्षी पर्जन्यमान अत्यंत कमी झाले असल्याने यावर्षी बीड जिल्ह्यात आणि विशेषत: गेवराई तालुक्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक गावात आजच ग्रामस्थांना प्यायला पाणी नाही. या पुढच्या काळात हे पाण्याचे संकट आणखी भीषण होईल अशी स्थिती आहे. त्यासोबतच जनावरांच्या चाऱ्याचा आणि त्यांच्याही पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होत जाईल अशी स्थिती आहे. त्यामुळे अशा संकट काळात सर्वसामान्यांना आधार देण्याची गरज आहे. परंतु प्रशासन लाचखोरीत व्यस्त असल्याने त्यांना सामान्यांचे प्रश्नच कळायला मार्ग नाही. त्यामुळे वेळीच प्रशासनाने दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेऊन सदर परिस्थिती हाताळण्यासाठी उपाययोजना कराव्यात. त्यासोबतच मागणी येईल तिथे पाण्याचे टँकर सुरू करावेत. पशुधन वाचवण्यासाठी जनावरांच्या छावण्या सुरू कराव्यात. शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम मिळालेली नाही ती १००% मंजूर करून वाटप करावी. सन २०२३ चा २५% अग्रीम पिक विमा १००% शेतकऱ्यांना मिळालेला नाही, तो तात्काळ द्यावा. शेतकऱ्यांना सन २०२२ चे अतिवृष्टी अनुदान मिळालेले नाही ते तात्काळ द्यावे. पीक कर्जाचा व्याज परतावा शेतकऱ्यांना मिळत नाही तो विना विलंब द्यावा. उत्पादन



झालेल्या सोयाबीन, कापूस यांना योग्य भाव द्यावा. शासनाच्या आदेशाविरोधात जात बँकांकडून कर्ज वसुली सुरू आहे, शेतकऱ्यांच्या कर्ज थकबाकीमुळे खात्याला लागलेले होल्ड तात्काळ काढावेत. यासह विविध मागण्या करण्यात आल्या आहेत. या मागण्यांची दखल घेऊन यावर तात्काळ उपाययोजना न केल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन केले जाईल असा इशाराही प्रशासनाला देण्यात आला आहे. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी ही उपस्थित होते.

## संपादकीय

# पत्नी मेली, तशी लक्ष्मीही गेली!

भारतीय संस्कृतीत महिलांना अनन्य साधारण महत्त्व आहे. पौराणिक ग्रंथामध्ये स्त्रीचे गुणगौरव केलेले दिसून येते. “यत्र नार्यस्तु पुजंते, रमते तत्र देवतः!” या पवित्र संस्कृत विधानाची आपल्याला आता खात्री पटली आहे. आपल्या देशात पुरुषसत्ताक पद्धती आहे, याचा बऱ्याच संधीसाधूंनी विपर्यास केला. स्त्रीला एक भोग्य वस्तू, डावी, गौण, अपशकूनी, अबला अशा आदी उपाध्यांनी तिचे श्रेष्ठत्व मलिन आणि दुबळे केले. परंतु तिच्या महात्म्याचे दर्शन किंवा अनुभूती एखाद्यालाच होते. हे आपण आज छातिठोक सांगू इच्छितो. अशी आपबिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी यांनी व्यक्त केली आहे... संपादक.

महिलांनी स्वतःच्या हक्कासाठी दिलेल्या लढ्याच्या स्मरणार्थ दरवर्षी ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्यात येतो. संपूर्ण विश्वाच्या पाठीवर इ.स.१९११ साली पहिल्यांदा जागतिक महिला दिन साजरा केला गेला. दिनांक २८ फेब्रुवारी १९०९ रोजी न्यूयॉर्क येथे पहिला महिला दिन साजरा करण्यात आला होता. तथापि सन १९१०च्या आंतरराष्ट्रीय महिला परिषेदत मांडलेल्या सुचनेनुसार ८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून निश्चित करण्यात आला. भारतीय संस्कृतीत महिलांना अनन्य साधारण महत्त्व आहे. पौराणिक ग्रंथामध्ये स्त्रीचे गुणगौरव केलेले दिसून येते. “यत्र नार्यस्तु पुजंते, रमते तत्र देवतः!” या पवित्र संस्कृत विधानाची आपल्याला आता खात्री पटली आहे. आपल्या देशात पुरुषसत्ताक पद्धती आहे, याचा बऱ्याच संधीसाधूंनी विपर्यास केला. स्त्रीला एक भोग्य वस्तू, डावी, गौण, अपशकूनी, अबला अशा आदी उपाध्यांनी तिचे श्रेष्ठत्व मलिन आणि दुबळे केले. परंतु तिच्या महात्म्याचे दर्शन किंवा अनुभूती एखाद्यालाच होते. हे आपण आज छातिठोक सांगू इच्छितो.

घरात जोपर्यंत स्त्रीचा वावर असतो, तोपर्यंतच त्या घरास घरपण असते. म्हातारे लोक म्हणतात त्याप्रमाणे ती देवता- लक्ष्मीच असते. त्या घरात तिच्या सहवासाने जीवंतपणा, शांती, प्रेम, वात्सल्य, दया, नम्रता, हे दैवी गुण ठासून असतात. स्त्रीविरहित घर एकप्रकारचे स्मशान असते. कोरोनाच्या जबरदस्त प्रादुर्भावात सन २०२१मध्ये माझी प्रेमळ पत्नी- आशाताई मरण पावली आणि माझ्या घराची आण, बाण व शान पुरती धुळिला मिळाली. कोना न कोना प्रसन्न वाटणारा तेव्हा अडगळ भासू लागला. सगेसोयरे, शेजारी व समाज यांच्या दरम्यान प्रचंड मोठी दरी निर्माण झाली. त्यांचे पाहुणे म्हणून येणे, बसणे, ऊठणे, हसणे, खिदळणे, बागडणे सारे काही हराम झाले. “अतिथी देवो भवः!” या सुवर्ण क्षणासाठी मन आतुर होऊ लागले.

ती माऊली गेल्यापासून घरातील शीतल साऊलीच हरपली, असे वाटत होते. घरात एका पाठोपाठ एक असे चार मांजरीचे पिल्लू पाळून पाहिले, मात्र तीनचार-तीनचार महिन्यांच्या अंतराने बिचारे मरतच गेले. आपणच महापातकी आहोत की काय? अशी अपराधीपणाची भावना मनात घर करून बसली आहे. घराच्या वळचणीत, खिडकीत किंवा विजेच्या तारांवर आपले घरटे बांधून रोज आनंदाने चिवचिवाट करणारी चिमणीही तेव्हा दिसेनाशी झाली होती. घरात इकडून तिकडे व तिकडून इकडे दिवसात कितीतरी चकरा मारणारी चिचुंद्री पण दिसेल तर शप्पथ! इतका मोठ्ठा फरक आपण त्या घटकेला अनुभवला आहे, हे पांढऱ्या शुभ्र स्पटिकाप्रमाणे सत्य आहे. नेहमी ये-जा करत असणारे आपले अत्यंत काळजीवाहू नातलगसुद्धा ही स्मशान शांतता अनुभवत होते. एवढा फरक काही काळ- दोन वर्षे घरात एकही स्त्री नसल्याने पडलेला दिसला. यावरून आपण सूज्ञ वाचक स्त्रीचे श्रेष्ठत्व मोठे किती? कसे? आणि का? याचा अंदाज अवश्य बांधू शकाल, यात तिळमात्रही शंका नाही!

घरातली क्षुल्लकशी वाटणारी धुणे, भांडी, झाडलोट, स्वयंपाक, पाणी, आदी कामे उरकताना आपल्याला तारेवरची कसरत करावी लागत होती. घरबांधणी, घराची मालकी, राशनकार्ड, स्वयंपाकाचे गॅस कनेक्शन आधी सगळी जडावजड जबाबदाऱ्या तिने लिलया पेलल्या होत्या. खरे तर हे सगळे करताना आम्हास रडू कोसळत होते आणि ३३ कोटी देव आठवू लागले होते. वेळेवर आम्ही बापलेक अंघोळ, स्वयंपाक, जेवण, कपडे धुणे कधी केले काय नि कधी ना केले काय? विचारतो तरी कोण? नेहमीचा “अंघोळ करा, जेवण करा...” असा कळवळ्याचा सज्जड दम विरला होता. काळ्याकुट्ट अंधारातही काना न कोपऱ्यातील चकाकणाऱ्या वस्तू राहू द्या, परंतु लख्ख सूर्य प्रकाशातील अंगण तर “सद्या घरात सर्व माणसे मृतप्राय शरीरेच” असल्याची स्पष्ट साक्ष देत होते. घराचे घरपण, घरसजावट किंवा घरांगण स्वच्छता आदी एका स्त्रीजातीशिवाय शेकडो माणसेही पाहिजे तशी ठेवू शकत नाहीत. हे आज आपण पावन आंतरराष्ट्रीय महिला दिन निमित्त प्रामाणिकपणे मांडणे, आपले अहोभाग्य समजतोय!

# गणित: विज्ञानाची राणी!

आंतरराष्ट्रीय गणित दिवस- इंटरनॅशनल डे ऑफ मॅथेमॅटिक्स- आईडीएम हा जगभरात साजरा केला जातो. प्रत्येक वर्षी दि.१४ मार्च रोजी विश्व गणित दिन पाळण्यात येतो. सर्व देशांना शाळा, संग्रहालये, ग्रंथालये आणि इतर ठिकाणी विद्यार्थी आणि सामान्यजनता या दोघांसाठीच्या उपक्रमांद्वारे सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले जाते. गणिताचे महत्त्व उद्धृत करणारा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा हा संकलित लेख वाचकांच्या सेवेत सविनय सादर... संपादक.

युनेस्कोच्या कार्यकारी परिषदेने २०५व्या अधिवेशनात १४ मार्च हा आंतरराष्ट्रीय गणित दिवस म्हणून घोषित केला गेला. नोव्हेंबर २०१९मध्ये युनेस्कोच्या सर्वसाधारण परिषदेच्या ४०व्या सत्राने ते स्वीकारले गेले. आईडीएमचा उद्घाटन सोहळा दि.१४ मार्च २०२० रोजी झाला. तेव्हाची थीम गणित सर्वत्र आहे. या थीमच्या व्याप्तीमध्ये घडलेल्या घटना आणि क्रियाकलापांचे विहंगावलोकन आढळून येते. २०२१मध्ये थीम होती मॅथेमॅटिक्स फॉर अ बेटर वर्ल्ड. २०२२ची थीम मॅथेमॅटिक्स युनिट्स होती, तर २०२३ची थीम प्रत्येकासाठी गणित, ही होती. दरवर्षी उत्सवाची चव वाढवण्यासाठी, सर्जनशीलता वाढवण्यासाठी, गणित आणि सर्व प्रकारच्या फील्ड, संकल्पना आणि कल्पना यांच्यातील संबंधांना प्रकाश देण्यासाठी एक नवीन थीम जाहीर केली जाते. गणित आणि गणना हे आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. शाळेत गणित शिकण्यापासून ते आपल्या नियमित जीवनात अमलात आणण्यापर्यंत या विषयाचे महत्त्व आपण दुर्लक्षित करू शकत नाही. गणित शिकण्यातही मजा आहे. युक्त्या आणि टिपा ते अधिक मनोरंजक बनवतात. आपल्या नियमित जीवनात गणित शिकण्याच्या महत्त्वाबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी आंतरराष्ट्रीय गणित दिन साजरा केला जातो. आर्यभट्ट, ब्रह्मगुप्त, महावीर, भास्कर दुसरा, श्रीनिवास रामानुजन आणि इतर अनेक गणितज्ञांच्या योगदानाने गणिताचे क्षेत्र समृद्ध झाले आहे. या विशेष दिवशी, लोक त्यांचे स्मरण करतात, त्यांचा आदर करतात आणि त्यांच्या गणिताच्या क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांचे कौतुक करतात.

आंतरराष्ट्रीय गणित दिनानिमित्त, शैक्षणिक संस्था, गणितीय संस्था आणि इतर संस्था विविध कार्यक्रम आणि उपक्रमांचे आयोजन करतात. यामध्ये सेमिनार, कार्यशाळा, गणितीय प्रश्नमंजुषा आणि प्रख्यात गणितज्ञांची व्याख्याने यांचा समावेश असतो. रामानुजनसारख्या शास्त्रज्ञांच्या योगदानाचे स्मरण करणेच नव्हे तर विद्यार्थ्यांमध्ये आणि सामान्य लोकांमध्ये गणिताविषयीची सखोल प्रशंसा वाढवणे हे ध्येय आहे. आंतरराष्ट्रीय गणित दिनानिमित्त, या क्षेत्रात असामान्य योगदान देणाऱ्या गणितज्ञांना अनेक पुरस्कार आणि सन्मान प्रदान केले जातात. हे पुरस्कार केवळ समकालीन गणितज्ञांच्या कर्तृत्वालाच ओळखच नाहीत तर तरुण मनांना गणितात करिअर करण्यासाठी प्रेरणा आणि प्रोत्साहन देण्याचे साधन म्हणूनही काम करतात. आंतरराष्ट्रीय गणित दिवस आपल्या दैनंदिन जीवनात गणिताच्या सर्वव्यापीतेवर प्रतिबिंबित करण्याची संधी प्रदान करतो. साध्या अंकगणित ऑपरेशन्सपासून आपल्या डिजिटल जगाला सामर्थ्यवान जटिल अल्गोरिदमपर्यंत, गणित असंख्य प्रक्रियांचा कणा बनवते. बँकिंग, अभियांत्रिकी, वैद्यकशास्त्र, अर्थशास्त्र आणि विविध वैज्ञानिक शाखा विश्लेषण, मॉडेलिंग आणि निर्णय घेण्यासाठी गणिताच्या तत्त्वांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. गणित, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्यातील समन्वय निर्विवाद आहे. वैज्ञानिक शोध आणि तांत्रिक नवकल्पनांमध्ये अनेकदा गुंतागुंतीचे गणितीय मॉडेलिंग आणि सिम्युलेशन यांचा समावेश होतो. भौतिकशास्त्र, संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकी यांसारखी क्षेत्रे सिद्धांत, डिझाइन प्रयोग आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी गणितीय फ्रेमवर्कवर अवलंबून असतात. भारतीय गणितज्ञांचेही खुपच मोठे योगदान आहे. आंतरराष्ट्रीय गणित दिवस संपूर्ण इतिहासात भारतीय गणितज्ञांच्या योगदानाची कबुली देण्याची संधी देखील प्रदान करतो. श्रीनिवास रामानुजन व्यतिरिक्त, भारताने आर्यभट्ट, ब्रह्मगुप्त आणि भास्कर II यासह इतर अनेक प्रसिद्ध गणितज्ञ निर्माण केले आहेत. त्यांच्या कार्याने अनेक गणिती तत्त्वे आणि संकल्पनांची पायाभरणी केली जी आजही प्रासंगिक आहेत.

गणितज्ञांच्या कर्तृत्वाचा उत्सव साजरा करताना, आंतरराष्ट्रीय गणित दिन देखील गणिताच्या शिक्षणातील आव्हानांकडे लक्ष वेधतो. जगाच्या अनेक भागांमध्ये, विद्यार्थ्यांना गणिताशी संघर्ष करावा लागतो आणि हा विषय अधिक सुलभ आणि आकर्षक बनवण्याची गरज आहे. अभिनव अध्यापन पद्धती, परस्परसंवादी शिक्षण संसाधने आणि तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण याद्वारे गणिताचे शिक्षण वाढवण्याचे प्रयत्न केले जात आहेत. गणिताच्या क्षेत्रातील लक्षणीय प्रगती असूनही, गणिताच्या शिक्षणाशी निगडीत आव्हाने आहेत ज्यांचे निराकरण करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय गणित दिन या आव्हानांवर चिंतन करण्याची आणि सर्व स्तरांवर गणिताचे शिक्षण वाढवण्याचे मार्ग शोधण्याची संधी देतो. गणिताची चिंता संबोधित करणे अत्यावश्यक आहे. गणिताची चिंता ही एक सामान्य समस्या आहे जी बऱ्याच व्यक्तींना गणिताशी पूर्णपणे संलग्न होण्यापासून रोखते. राष्ट्रीय गणित दिवस गणिताच्या चिंतेबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि ती कमी करण्यासाठी धोरणांना प्रोत्साहन देण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करू शकतो. गणिताबद्दल प्रेम वाढवण्यासाठी सकारात्मक आणि आश्वासक शिक्षण वातावरण तयार करणे महत्त्वाचे आहे. समावेशकतेला प्रोत्साहन देणेही गरजेचे आहे. गणिताच्या शिक्षणात सर्वसमावेशकतेला चालना देण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय गणित दिवस लिंग, सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी किंवा भौगोलिक स्थानाचा विचार न करता सर्व विद्यार्थ्यांना दर्जेदार गणित शिक्षणाच्या समान प्रवेशाच्या महत्त्वावर जोर देण्याची संधी प्रदान करतो. गणिताच्या क्षेत्रातील विविधतेला प्रोत्साहन देणे ही नवकल्पना आणि सर्जनशीलतेला चालना देण्याची गुरुकिल्ली आहे.

गणिताच्या शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण शिकण्याचे अनुभव वाढवू शकते आणि गणिताच्या संकल्पना अधिक सुलभ बनवू शकते. गणिताचे शिक्षण अधिक आकर्षक आणि प्रभावी बनवण्यासाठी इंटरएक्टिव्ह सॉफ्टवेअर, सिम्युलेशन आणि ऑनलाइन संसाधने यासारख्या तंत्रज्ञानाचा लाभ घेण्यासाठी आंतरराष्ट्रीय गणित दिन हा एक उत्प्रेरक ठरू शकतो. आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय गणित दिवस केवळ भारतापुरता मर्यादित नाही, त्याला जागतिक अनुनाद आहे. जगभरातील गणितज्ञ आणि शिक्षक या उत्सवात सामील होतात, गणितीय शोधांचे आंतरराष्ट्रीय स्वरूप आणि गणितीय संशोधन चालविणारे सहयोगी प्रयत्न यावर भर देतात. गणितीय संस्था आणि ऑर्गनायझेशन या दिवसाचा उपयोग विचारांच्या देवाणघेवाणीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि गणिताच्या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवण्यासाठी करतात. गणिताचा समाजावर होणारा परिणाम मोठा आहे. गणित, ज्याला “विज्ञानाची राणी” असे संबोधले जाते, ते आपल्या जीवनातील विविध पैलूंमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. त्याचे ॲप्लिकेशन सैद्धांतिक अमूर्ततेच्या क्षेत्रापुरते मर्यादित नाहीत परंतु विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, अर्थशास्त्र आणि बरेच काही यासारख्या क्षेत्रांमध्ये व्यावहारिक समाधानापर्यंत विस्तारित आहेत.

तांत्रिक प्रगती अविस्मरणीय आहे. २१व्या शतकातील तंत्रज्ञानाचा लँडस्केप गणितावर खूप अवलंबून आहे. संगणक अल्गोरिदमपासून डेटा विश्लेषणापर्यंत, गणिती तत्त्वे तंत्रज्ञानाच्या विकासावर आधार देतात जे आपल्या दैनंदिन जीवनाला आकार देतात. राष्ट्रीय गणित दिवस हा गणित आणि तंत्रज्ञान यांच्यातील सहजीवन संबंधाची आठवण करून देतो. गणित ही विज्ञानाची भाषा आहे, जी नैसर्गिक जग समजून घेण्यासाठी एक पद्धतशीर आणि अचूक फ्रेमवर्क प्रदान करते. वैज्ञानिक प्रगती आणि शोध अनेकदा गणितीय मॉडेल्स आणि समीकरणांसह असतात जे घटनांचे वर्णन करतात आणि अंदाज लावतात. राष्ट्रीय गणित दिवस वैज्ञानिक प्रगतीमध्ये गणिताची भूमिका साजरा करतो. अर्थशास्त्र आणि वित्त क्षेत्रामध्ये, गणित आर्थिक प्रणालींचे मॉडेलिंग, बाजारातील ट्रेंडचा अंदाज लावणे आणि निर्णय घेण्याची प्रक्रिया अनुकूल करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. अर्थशास्त्रातील गणिती तत्त्वांच्या वापरामुळे जागतिक आर्थिक धोरणांना आकार देणारी वित्तीय मॉडेल्स आणि धोरणे विकसित झाली आहेत.

तांत्रिक प्रगती, वैज्ञानिक शोध आणि आर्थिक उपयोगांवर गणिताचा प्रभाव स्पष्ट दिसत असला तरी, त्याचा प्रभाव दैनंदिन जीवनातही आहे. वैयक्तिक आर्थिक व्यवस्थापनापासून ते स्वयंपाक आणि घर सुधारणा प्रकल्पांपर्यंत, दैनंदिन क्रियाकलापांच्या विविध पैलूंमध्ये गणिती संकल्पना विणल्या जातात. राष्ट्रीय गणित दिवस लोकांना त्यांच्या जीवनातील गणिताचे सर्वव्यापी स्वरूप ओळखण्यास आणि त्याचे कौतुक करण्यास प्रोत्साहित करतो. आपण आंतरराष्ट्रीय गणित दिवस साजरा करत असताना, गणिताच्या भविष्याकडे पाहणे आणि उदयोन्मुख ट्रेंडची अपेक्षा करणे आवश्यक आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग आणि डेटा सायन्सच्या गणितासह एकत्रीकरणामुळे गणितीय संशोधन आणि ॲप्लिकेशन्सच्या लँडस्केपला आकार मिळण्याची शक्यता आहे. आधुनिक आव्हानांचे आंतरविद्याशाखीय स्वरूप गणितज्ञांना विविध क्षेत्रातील तज्ञांसह सहयोग करण्यास सांगतात. आंतरराष्ट्रीय गणित दिवस हा गणितज्ञांच्या चिरस्थायी वारशाचा आणि समाजावरील त्यांच्या प्रभावाचा पुरावा आहे. हे विश्वातील रहस्ये उलगडण्यात गणिताच्या सौंदर्याची आणि सामर्थ्याची आठवण करून देणारे आहे. आपण हा दिवस साजरा करत असताना, आपण केवळ श्रीनिवास रामानुजन यांच्या स्मृतीचा सन्मान करू नये, तर आपल्या वेगाने विकसित होत असलेल्या जगात गणिताला अधिक सुलभ, आकर्षक आणि संबंधित बनवण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांनाही मान्यता देऊ या. गणित, त्याच्या असीम शक्यतांसह, प्रेरणा देत राहते आणि भविष्याला आकार देत राहते, आंतरराष्ट्रीय गणित दिन हा बौद्धिक कुतूहल, शोध आणि अदम्य मानवी आत्म्याचा उत्सव बनवतो.

दि.१४ मार्च रोजी सेमिनार, कार्यशाळा, व्याख्याने आणि गणित स्पर्धा यासह विविध कार्यक्रम आणि उपक्रमांसह हा दिवस साजरा केला जातो. शैक्षणिक संस्था, गणितीय संस्था आणि संशोधन संस्था अनेकदा गणिताचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी विशेष कार्यक्रम आयोजित करतात. गणित महत्वाचे का आहे? तर, विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, अर्थशास्त्र आणि वित्त यांसह विविध क्षेत्रांमध्ये गणित महत्त्वपूर्ण आहे. हे नैसर्गिक जग समजून घेण्यासाठी आणि वर्णन करण्यासाठी एक वैश्विक भाषा प्रदान करते. अनेक तांत्रिक प्रगती आणि वैज्ञानिक शोधांसाठी गणितीय संकल्पना आणि तंत्रे मूलभूत आहेत.

!! जागतिक गणित दिनाच्या माझ्या देशबांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त मधुभाष-7775041086.**

# गायीच्या शेणाच्या टॅबलेट बाजारात उपलब्ध

## गायीचे शेण सर्व रोगावर गुणकारी--कैलास देशमुख

**वादळवार्ता/सोयगाव**
आरोग्यासाठी लाभदायक असलेल्या गायीच्या शेणाच्या चक्क टॅबलेट व चूर्ण उपलब्ध झाले आहे त्यामुळे देशी गायीच्या शेणाला विशेष महत्व प्राप्त झाले असून सर्व व्याधींवर गुणकारी म्हणून गायीच्या शेणकडे पाहिले जाते असे प्रतिपादन कैलास देशमुख यांनी मंगळवारी सोयगाव येथे अंजनाई गोशाळेच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित व्यक्त केले

क्रांती जनहित संस्थेच्या अंजनाई गोशाळेच्या वर्धापनदिन साजरा करण्यात आला यावेळी गोशाळेतील ५६ गोवंशाचे वाढदिवस अनोख्या पद्धतीने संस्थेच्या वतीनं साजरा करण्यात आला होता अध्यक्ष स्थानी कैलास देशमुख,गोशाळेचे सचिन आगे जिल्हा संघटक लोकेश पाटील,शिक्षक सेनेचे विठ्ठल बदर, ह भ प सुधानवा केनेकार महाराज, रघुनाथ चव्हाण,सुभाष वाडेकर,किशोर झवर,आदींची




व्यासपीठावर उपस्थिती होती यावेळी मान्यवरांनी गायींबद्दल मनोगत व्यक्त केली प्रास्ताविकात संदीप इंगळे यांनी सांगितले की गोशाळेच्या स्थापनेच्या दिनी तीन गायी होत्या आता त्या ५६ वर गायीचा आकडा पोहचला आहे हे सर्व माझ्या सहकाऱ्यांनी यशस्वी केले आहे सचिन आगे यांनी गोवंशाची काळजी बाबत मार्गदर्शन केले लोकेश पाटील यांनी सध्याच्या काळात गाईच्या वंश शुद्धीकरण करणे गरजेचे आहे असे सांगितले सूत्र संचालन दत्ता गाडेकर यांनी केले यावेळी संस्थेचे सदस्य दिलीप शिंदे, किशोर झवर,सुभाष गव्हाड मयूर मनगटे,अमोल हिरे,ज्ञानेश्वर गाडेकर, अनिल लोखंडे, दिनेश पंडित विश्वनाथ कोथलकर, शांताराम तेलंगरे विनोद चौधरी विनोद वामने,कडूबा गाडेकर निलेश गाडेकर राहुल परदेशी, मंगला बाई गाडेकर उर्मिला बाई इंगळे पद्मा बाई शिंदे मीना गाडेकर, रुपाली लोखंडे, पल्लवी गाडेकर रोहिणी गाडेकर कार्तिकी गाडेकर आदींची उपस्थिती होती यावेळी आभार संदीप इंगळे यांनी केले...

# रेने नोरोन्हा - भारतामधील सर्वात तरुण महिला आयर्नमॅन ॲथलीट




वादळवार्ता/मुंबई
रेने नोरोन्हा ही १८ वर्षीय भारतीय नागरिक असून मद्रासमधील आयआयटीची प्रथम वर्षाची पदवीधर विद्यार्थिनी आहे. २ मार्च २०२४ रोजी आयोजित आयर्नमॅन एनझेड स्पर्धेत तिने १८ ते २४ या वयोगटात ५वे स्थान मिळवले. या स्पर्धेतील ती सर्वात तरुण स्पर्धक होती. सर्व अडथळ्यांना आव्हान देत, सक्षम बनण्याच्या तिच्या ध्येय, विश्वास आणि समर्पणामुळे तिची कामगिरी प्रशंसनीय आहे. रेने नोरोन्हाच्या यशस्वी वाटचालीतून देशातील महिला खेळाडूंना नक्कीच प्रोत्साहन मिळेल. शनिवार दि.२ मार्च २०२४ रोजी न्यूझीलंड मधील टाउपो येथे आयोजित २०२४ आयर्नमॅन स्पर्धेत चाळीसहून अधिक देश आणि प्रदेशांतील दोन हजाराहून अधिक खेळाडूंनी भाग घेतला, हा एक ऐतिहासिक दिवस आहे. कारण या स्पर्धा कार्यक्रमाचा चाळीसावा वर्धापनदिन साजरा होत आहे. न्यूझीलंड देशामध्ये सर्वात मोठे तलाव असलेल्या ताउपो तलावामध्ये ३.८ किमी पोहणे, ताउपोच्या आजूबाजूच्या ग्रामीण लँडस्केपमध्ये १८० किमीची सवारी करणे तसेच लेकफ्रंट बाजूने ४२.२ किमी धावणे हे खास वैशिष्ट्य आहे.

रेनेला प्रेरणा आणि प्रशिक्षण दिल्याबद्दल तिचे ट्रायथलॉन प्रशिक्षक शंकर थापा तसेच ट्राय टूपर्सच्या संघाचे खूप खूप आभार आणि अभिनंदन. रेनी सोबत शंकरने सुध्दा ही खडतर शर्यत पूर्ण केली, हे समर्पण आणि खिलाडूवृत्तीचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. शंकर हे अनुभवी प्रशिक्षक आहेत. त्यांनी अनेक आयर्नमॅन, अल्ट्रामॅन शर्यत, कॉमरेड्स तसेच विविध आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनमध्ये सहभाग घेतला आहे. रेने नोरोन्हाचे धाव प्रशिक्षक राज वडगामा, जीएससी मधील अल्ट्रा मॅन रेस स्पेशालिस्ट, गोरेगाव स्पोर्ट्स क्लबचे जलतरण प्रशिक्षक मुर्गेश सर, फिजिओथेरपिस्ट मिशेल मिनेझिस, प्राची सत्रा आणि अंकिता मातोंडकर, पोडियाट्रिस्ट पल्लवी सिंग, आहारतज्ञ कृष्णी चेड्डा आणि क्रीडा समुपदेशक अमरू तसेच क्रिडा विषयक सल्लागार अमृता कारखानीस या सर्वांचे त्यांच्या अमुल्य योगदानासाठी मन:पूर्वक आभार! ट्रायथलॉन हा खेळ स्विकारण्याआधी रेने प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचे अध्यक्ष अरविंद रमेश प्रभू व सचिव डॉ. मोहन राणे यांच्या मार्गदर्शनाखाली व्यावसायिक जिम्नॅस्ट म्हणून अकरा वर्षे प्रशिक्षण घेत होती.

# उप जिल्हा रुग्णालयात महिला दिवस उत्साहात साजरा...

**वादळवार्ता/चंद्रपुर**
उप जिल्हा रूग्णालय वरोरा जिल्हा चंद्रपूर येथे महिला दिवस व नव्याने रूजू झालेल्या परिचारक व परिचारिका यांचा स्वागत समारंभ

आज दिनांक ११ मार्च २०२४ ला ऊप जिल्हा रूग्णालय वरोरा येथे जागतिक महिला दिनानिमित्त व नव्याने रूजू झालेल्या परिचारक व परिचारिका यांचा सत्कार व स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता.हा कार्यक्रम डॉ प्रफुल्ल खूजे वैद्यकीय अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सौ वंदना विनोद बरडे अधीसेवीका यांनी आयोजित केला होता.या कार्यक्रमाला डॉ अश्विनी गेडाम स्त्रीरोगतज्ज्ञ, डॉ वंदेश शेंडे नेत्ररोग तज्ञ,सौ वंदना विनोद बरडे अधीसेवीका व सौ देवयानी कापडे सामाजिक कार्यकर्त्या मंचावर उपस्थित होते.दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.प्रास्तावीक सौ वंदना विनोद बरडे अधीसेवीका यांनी केले.सर्वांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या व नवनिर्वाचीत परिचारिका यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.महीला दिवसांचे महत्त्व समजावून सांगितले. आणी नवनिर्वाचीत परिचारिका यांना आपल्या क्षेत्रांत चांगलें उल्लेखनीय कार्य करावेत. एकमेकांचा आदर सन्मान करावा असे प्रतिपादन केले बॉच शीरोमनी करण्यात आला.व वंदना विनोद बरडे अधीसेवीका यांनी परिचर्येची शपथ दिली..डॉ शेंडे यांनी मार्गदर्शन केले. महीला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.डॉ गेडाम यांनी मार्गदर्शन केले.




हिर्दीक शुभेच्छा दिल्या व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रियंका दांडेकर अधिपरिचारीका यांनी केले व आभारप्रदर्शन व्रुशाली दहेकर यांनी केले.कार्यक्रमासाठी आफरिन शेख,कुंदा मडावी यांनी मेहनत घेतली.कोमल टोंगे, व्रुशाली दहेकर, तहसीन शेख,सोनल भगत यांचा सत्कार व स्वागत करण्यात आले.संगीता नकले व सरस्वती कापटे इंदिरा कोडापे सुनंदा पुसनाके तुलसी कूमरे, अंकिता टोंगे, आरती बैस शितल राठोड हजर होत्या.सर्वांनी मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# जगदगुरू नरेंद्राचार्यजी महाराज यांचा भव्य पादुका दर्शन सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**

अनंत श्री विभूषित जगद्गुरु रमानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज, जगदुरू रामानंदाचार्य दक्षिण पीठ, नानिजधाम (महाराष्ट्र ) यांच्या उरण येथील पादुका दर्शन सोहळ्याची सुरुवात जगदगुरु श्री”च्या सिद्ध पादुकां समवेत भव्य दिव्य शोभा यात्रेने सकाळी १० वाजता , जि.डी.एल. पेट्रोपपंप खोपटा रोड येथून नवघर गाव - फुंडे रोड - नवघर पाडा - कनकेश्वरी मैदान या मार्गाने करण्यात आली. या शोभा यात्रेमध्ये कलशधारी महिला, निशाण धारी, राम दरबार, झाशीची राणी, ढोल ताशा, लेझिम , धर्मक्षेत्र, झेंडाधारी, असे विविध कलापथका सहभागी झाले होते.या पादुका दर्शन सोहळा प्रसंगी जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थान नाणीजतर्फे विविध कार्यक्रम राबविण्यात आले. “ जगदगुरु श्री” च्या पादुकांचे आगमन, आरती, सामाजिक उपक्रम सोहळानंतर गुरुपूजन, प्रवचन, उपासक दिक्षा दर्शन, पुष्पवृष्टि असे अनेक कार्यक्रम योवेळी संपन्न झाले. आजच्या पादुका दर्शन सोहळ्याचे औचित्य साधून ज.न. म.संस्थानला फिरत्या शौचालयाचे सर्व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आणि जिल्हा सेवा समिती उत्तर रायगड च्या वतीने लोकार्पण करण्यात आले.. या पादुका व दर्शन सोहळाप्रसंगी व्यासपीठावर मनोहरशेठ भोईर - माजी आमदार उरण विधानसभा,महेंद्रशेठ घरत - रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष,जे एम. म्हात्रे - माजी नगराध्यक्ष पनवेल, रमेश ठाकूर - माजी उपनगराध्यक्ष उरण नगरपरिषद,नारायण शेठ घरत, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती, विकास नाईक उरण तालुका शेकाप चिटणीस,सविता नितीन मढवी- सरपंच नवघर,कुणाल पाटील - सरपंच पागोटे, सुरेश बंडा - माजी उपसरपंच नवघर, रुपेश पाटील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे तालुका उपसंघटक,जी.के. म्हात्रे - ग्रामसेवक नवघर,राकेश खराडे - संपादक, महाराष्ट्र न्यूज लाईव्ह,परेश पाटील - अध्यक्ष नवघर ग्रामस्थ मंडळ, प्रियदर्शनी म्हात्रे ग्रामपंचायत सदस्य नवघर हरीचंद्र पाटील - उद्योजक,प्रकाश पाटील बिल्डर्स ऍण्ड डेव्हलपमेंट, डोंबिवली, दिपक खरुडे पीठ व्यवस्थापक नाणिज,उदय रणभरे - ज न म संस्थान ट्रस्टी, अप्पा सोमदे पादुका दर्शन सोहळा दवरा प्रमुख, गणेश मोरे- नाशिक उपपीठ प्रमुख, अरुण कुथे - माजी पीठ सहाय्यक, अविनाश जागृष्टे मुख्य पीठ युवा निरीक्षक, सीमा पाटील महिला पीठ निरीक्षक आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जगदगुरू नरेंद्राचार्यजी महाराज यांचा महाराष्ट्रात खूप मोठा भक्त वर्ग असून त्यांच्या हितचिंतकांनी संख्या खूप मोठी आहे. जगदगुरू नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात अनेक विविध सामाजिक उपक्रम सूरु आहेत. नुकत्याच १० फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी २०२४ या अवघ्या १६ दिवसांमध्ये महाराष्ट्रसह इतर ६ राज्यांमध्ये पार पडलेल्या ८५० महाक्तदान शिबिर मधून महाराष्ट्र शासनाच्या आणि इतर राज्यांच्या रक्तपेढ्याना ८१२६० रक्त कुपिकांच रक्तदान करण्यात आले. करोना काळात मा. मुख्यमंत्री सहायता निधीसाठी ५० लाख रुपयाची आर्थिक मदत,मा. पंतप्रधान सहायता निधीसाठी बावन्न लाख रुपयांची आर्थिक मदत, रत्नागिरी जिल्हा पोलिस प्रशासनाला १० लाखाचा धनादेश, रत्नागिरी जिल्हा प्रशासनाला १५ लाखाचा धनादेश जगदगुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थान च्या माध्यमातून करण्यात आले.जगदगुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानाचा मरणोत्तर देहदान हा उपक्रम जनमानसामध्ये अत्यंत प्रभावीपणे यशस्वी होत आहे. सप्टेंबर २०१६ ते ११ मार्च २०२४ या कालावधीत ५३ मरणोत्तर देह समाजाच्या सेवेसाठी शासकीय मेडिकल




कॉलेजना सुपूर्द करण्यात आले. ब्लड ईन नीड या उपक्रमाच्या माध्यमातून ज्या रुग्णांना रक्तांची गरज भासते त्या त्या ठिकाणी हॉस्पीटल येथे जाऊन आजपर्यंत २०००० पेक्षा जास्त रक्तदात्यानी रुग्णांना वेळीच रक्त देउन त्यांचे प्राण वाचविले आहेत. महापूर, भूकंप आदि नैसर्गिक आपत्ती तसेच कोरोना महामारीच्या काळातही अखंडपणे संस्थानतर्फे रुग्णसेवा सुरू होती. आज संस्थानतर्फे ५२ रुग्णवाहिका २४ तास कार्यरत आहेत. या शिवाय समाज जागृती लोक प्रबोधन, व्यसन मुक्ती, संस्कृतीचे संरक्षण, अंधश्रद्धा निर्मूलन आदी विविध उपक्रमही सुरु आहेत.महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यक्रमात त्यांच्या कार्यक्रमांना गर्दी असते. तशीच मोठ्या प्रमाणात गर्दी उरण तालुक्यातील कानकेश्वरी मैदान, नवघर पाडा येथे पाहावयास मिळाली. जवळ जवळ २०००० ते २५००० भाविक भक्तांची येथे उपस्थिती होती.सदर सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थांनचे सर्व पदाधिकारी , जिल्हा सेवा समिती उत्तर रायगडचे सर्व पदाधिकारी सदस्य, स्व स्वरूप संप्रदायचे सर्व भक्तगण, शिष्य वर्ग, उपासक यांनी विशेष मेहनत घेतली.

# बीड जिल्ह्यातील मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानांतर्गत

## प्रथम, द्वितीय ,तृतीय आलेल्या शाळांचे जिल्हास्तर व तालुका स्तरावरील पुरस्कार रखडले.

**वादळवार्ता/केज**
-मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हे अभियान एक जानेवारी ते १५ या कालावधीत महाराष्ट्र शासनामार्फत राबवण्यात आले होते. यात गुणवत्तापूर्ण शिक्षण, तंत्रज्ञानाचा वापर, डिजिटल शाळा, पर्यावरण पूरक आनंददायी वातावरण, क्रीडा, आरोग्य, वैयक्तिक व परिसर स्वच्छता , व्यवसायिक अभ्यासक्रम, राष्ट्रप्रेम ,राष्ट्रीय एकात्मता, विद्यार्थी बचत बँक, महावाचन चळवळ, लोकसहभागअशा बाबींवर शाळांचे केंद्रस्तर , तालुकास्तर,जिल्हास्तर विभाग स्तर, राज्यस्तर अशा स्तरांवर ऑनलाईन व प्रत्यक्षात मूल्यमापन करण्यात आले होते यावरून सर्व निकष पूर्ण करणाऱ्या शाळांचे प्रथम द्वितीय ,तृतीय ,असे क्रमांक काढण्यात आले व राज्य व विभागाचे बक्षीस वितरण माननीय मुख्यमंत्री यांच्या हस्ते दिनांक ५/०३/२०२४ रोजी मुंबई येथे थाटामाटात करण्यात आले परंतु बीड जिल्ह्यातील तालुका व जिल्हा स्तरावरील बक्षीस वितरण अद्याप झालेले नाही. तेव्हा आता सर्व राज्यातील लोक प्रतिनिधींना, शासकीय पदाधिकाऱ्यांना निवडणुकीचे वेध लागलेले असून जिल्ह्याचे बक्षीस वितरण, तालुक्याचे बक्षीस वितरण अद्यापही रखडलेले आहे.

# पुण्यामधील नेत्रा नाईकवाडी हिला राज्यस्तरीय कलारत्न पुरस्कार

**दैनिक वादळवार्ता**
**पुणे/चैताली औटे**
टॅलेंट कट्टा या संस्थेच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून राज्यस्तरीय स्त्री गौरव पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते. नेत्रा नाईकवाडी हिला २०२४ सालच्या राज्यस्तरीय कलारत्न पुरस्कार सायंटिस्ट डॉ नीता दोशी आणि प्राध्यापक राम बंडगर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला .विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या परंतु प्रसिद्धी पासून दूर असलेल्या कर्तृत्ववान महिलांना टॅलेंट कट्टा या संस्थेतर्फे दरवर्षी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विविध पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यंदाचा स्त्री गौरव पुरस्कार वितरण




समारंभ कालच पार पडला. नेत्रा नायकवडी हिला कला क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. नेत्रा नाईकवाडी ही बाल कलाकार आहे. लहानपणापासूनच तिला कलेची आवड आहे. रांगोळी, मेहंदी, डान्स, चित्रे काढणे हे तिचे आवडते छंद आहेत. तिचे यामधील कला कौशल्य पाहून तिला माधुरी सखी मंच कडून उत्कृष्ट चाइल्ड आर्टिस्ट पुरस्कार मिळाला आहे. तसेच तिने चित्रकलेमध्ये ५०० हुन अधिक चित्रे रेखाटले आहेत यामध्ये महाराष्ट्रातील अनेक दिग्गजांची सुंदर रेखीव चित्रांचा समावेश यामध्ये आहे. तिच्या या कला क्षेत्रातील कलेची दखल घेऊन तिला हा पुरस्कार देण्यात आला. सदरील या पुरस्काराचे स्वरूप सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ आणि शाल ,फेटा बांधून सन्मान करण्यात आला. सदर पुरस्कार बारामती या ठिकाणी पार पडला.यावेळी टॅलेंट कट्टा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिपक जाधव आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक
# वादळ वार्ता

## अपंग कलाकार संघटना च्या वतीने कलाकारांना मानधन मिळावे

दैनिक वादळ वार्ता पुणे/पंकज भंडारी अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचा कलाकार स्नेह मेळावा कोथरूड पुणे येथे संपन्न झाला या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती पुणे शहर महापौर मुरलीधर मोहोळ अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले दिग्दर्शक अभिनेता प्रवीण तरडे त्यावेळेस अभिनेता दिग्दर्शक अपंग कलाकार संघटना अध्यक्ष प्रमोद पंडित यांनी अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले व दिग्दर्शक अभिनेते प्रवीण तरडे यांना महाराष्ट्रातील अपंग कलाकारांना मानधन मिळावे ही विनंती केली आहे.



# महाराष्ट्रातील चर्चित चेहरे म्हणुन प्रदिप खाडे यांचा केंद्रिय मंत्री भागवत कराड यांच्या हस्ते सन्मान

**वादळवार्ता/परळी वैजनाथ**
संपूर्ण महाराष्ट्रातातुन राजकिय,सामाजीक,शैक्षणिक,धार्मिक व इतर क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या व्यक्तींचा देशातील सर्वात मोठ्या वृतपत्र समुह असलेल्या भास्कर ग्रुपच्या दिव्य मराठी च्या वतिने सोमवार दि.११ मार्च रोजी महाराष्ट्रातील चर्चित चेहरे म्हणुन सन्मान करण्यात आला.यात कृषीमंत्री ना.धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव,कै. रामभाऊ (अण्णा) खाडे सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष प्रदिप खाडे यांचा केंद्रिय मंत्री भागवत कराड यांच्या हस्ते सहकुटुंब सन्मान करण्यात आला.

दिव्य मराठीच्या वतिने महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील निवडक व्यक्तींची चर्चित चेहरे या सन्मानासाठी निवड केली जाते.कृषीमंत्री ना.धनंजय मुंडे यांचे विश्वासु असलेले प्रदिप खाडे यांनी कै.रामभाऊ (अण्णा) खाडे या सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून दिंद्रुड,लातुर परिसरात अनेक शैक्षणीक संस्था उभारुन गोरगरीब विद्यार्थ्यांना त्यांच्याच भागात दर्जेदार शिक्षण उपलब्ध करुन दिले आहे.नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव म्हणुन त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे.शैक्षणीक क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेत दिव्य मराठीने चर्चित चेहरे या सन्मासाठी महाराष्ट्रातुन त्यांची निवड केली होती. सोमवार दि.११ मार्च रोजी छत्रपती संभाजीनगर येथील हॉटेल फर्न रेसिडेन्सीच्या सभागृहात दिव्य मराठीचे सीईओ निशीत जैन,युनिट हेड सुभाष बोंद्रे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या सन्मान सोहळ्यात केंद्रिय अर्थराज्यमंत्री भागवत कराड यांच्या हस्ते सहकुटुंब सन्मान करण्यात आला.यावेळी सत्कारास उत्तर देताना प्रदिप खाडे म्हणाले की, कृषीमंत्री ना.धनंजय मुंडे साहेबांच्या कल्पनेतील सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना आपल्याच भागात दर्जेदार व उच्च शिक्षण देण्यासाठी आपण कटिबध्द असुन मराठी शाळांमधुनही सीबीएसई शिक्षणप्रणाली लागु करण्याची गरज असल्याचे सांगितले.या कार्यक्रमास महाराष्ट्रातुन सर्वच क्षेत्रातील कार्य करणार्या मान्यवरांची तसेच वैजनाथ भोसले बापू, संजय हिबाने, ज्ञानेश्वर मगर सर, रामराजे तोडकर सर, पत्रकार धनंजय आढाव, पत्रकार महादेव गित्ते आदी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




# नांदूरघाट मध्ये सहाय्यक पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांच्या पथकाची गुटख्यावर धाड

## १ लाख १२ हजाराचा मुद्देमाल ताब्यात

**दैनिक वादळ वार्ता**
**केज/गौतम बचुटे**
सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना यांच्या पथकाने नांदुरघाट ता. केज येथे कारवाई करून १ लाख १२ रु चा मुद्देमाल ताब्यात घेतला. दि.१२ मार्च रोजी सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना यांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, नांदूरघाट येथील महेश रमेश तारळकर रा. (नांदुरघाट ता. केज) हा स्वतःचे आर्थीक फायदयासाठी महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा किरायाने गोडाऊन करुन



त्यामध्ये ठेवुन सदर प्रतिबंधीत गुटख्याची बेकायदेशिर चोरटी विक्री करित आहे. अशी खात्रीलायक माहिती मिळाल्याने सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना यांनी पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे आणि त्यांच्या पथकातील पोलीस नाईक दिलीप गित्ते, पोलीस अंमलदार शमीम पाशा यांना सदर ठिकाणी जावुन छापा मारण्याचे आदेश दिले. आदेश मिळताच पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे आणि त्यांच्या पथकातील पोलीस नाईक दिलीप गित्ते, पोलीस अंमलदार शमीम पाशा यांनी नांदूरघाट येथील गोडावूनवर छापा मारून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेले १ लाख १२ हजार २७२ रु रुपयाचा मुद्देमाल मिळुन आला. पोलिसांनी महेश रमेश तारळकर याला ताब्यात घेऊन कारवाई केली. सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकुर, अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती चेतना तिडके मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना यांच्या आदेशाने पोलीस उपनिरीक्षक आंनद शिंदे, पोलीस नाईक दिलीप गित्ते, पोलीस अंमलदार शमीम पाशा यांच्या पथकाने केली आहे.

# १९ मार्चच्या उपवासात अनेक मान्यवरांचा सहभाग

**वादळवार्ता/आंबाजोगाई**
आत्महत्या केलेल्या तमाम शेतकऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी दि.१९ मार्च रोजी महाराष्ट्रातील अनेक मान्यवर उपवास/अन्नत्याग करणार आहेत. अशी माहिती किसान पुत्र आंदोलनाचे नेते अमर हबीब यांनी दिली. प्रसिद्ध समाजसेवक अभय बंग (वर्धा), अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष व निवृत्त सनदी अधिकारी लक्ष्मीकांत देशमुख (पुणे), प्रख्यात समाजसेवक आणि लेखक हेरंब कुलकर्णी (अहमदनगर), निवृत्त अधिकारी पुरुषोत्तम गावंडे (अकोला), विख्यात गजलकार गजानन वाघमारे (महागाव), संवेदनशील कवयित्री अंजली कुलकर्णी (पुणे), आदिवासींच्या आरोग्यासाठी कार्य करणारे डॉ. सतीश गोगुलवार (गडचिरोली), भारत-पाक मैत्री संघाचे, पत्रकार जातीन देसाई (मुंबई), नामवंत साहित्यिक प्रा. डॉ. मारोती कसाब (उदगीर), सुप्रसिद्ध रिडिओलॉजिस्ट डॉ.आशिष लोहे (अमरावती) यांच्या सह राज्याच्या वेगवेगळ्या भागातील अनेक मान्यवर अन्नत्याग आंदोलनात भाग घेत आहेत. परभणी जिल्ह्यातील दैठणा येथून निघून पाथरी येथे सांगता होणारी पदयात्रा सुभाष कच्छवे व त्यांचे सहकारी काढीत आहेत. समारोप कार्यक्रमात प्रसिद्ध कवी इंद्रजीत भालेराव हे मार्गदर्शन करणार आहेत. पश्चिम महाराष्ट्रात सांगली जिल्ह्यातील मौजे दिग्रज येथून निघून जयसिंगपूर येथे पदयात्रेचा समारोप होणार आहे. डॉ.राजीव बसर्गेकर व ऍड.सागर पिलारे यांच्या




नेतृत्वात ही पदयात्रा चालेल. जयसिंगपूर येथे होणाऱ्या सांगता कार्यक्रमाचे संयोजन दिलीप माणगावे आणि सहकारी करीत आहे.अन्नत्याग कार्यक्रम महाराष्ट्रात शेकडो ठिकाणी अन्नत्याग/उपवास कार्यक्रमाची तयारी सुरू आहे. किसानपुत्र आंदोलनाचे अमर हबीब हे आंबाजोगाई येथे उपोषण करणार आहेत. यावेळी शहर व परिसरातील अनेक किसान पुत्र अन्नत्यागात सहभाग घेणार आहेत. व्याख्यान व सन्मान अंबाजोगाई येथील नगर परिषदेच्या कार्यालय परिसरात सायंकाळी ४ वाजता शेतकरी आत्महत्यांच्या कारणांचा अभ्यास करणाऱ्या प्रा. शैलजा बरुरे यांचे व्याख्यान तर आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबायांचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रामाणिकपणे प्रयत्न करणा-या ऍड. संतोष पवार यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

# मुक बधीर विद्यार्थ्यांसमवेत कामगार नेते सुरेश पाटील यांचा वाढदिवस साजरा.

**दैनिक वादळ वार्ताउरण/विठ्ठल ममताबादे**
भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री,कामगार नेते सुरेश पाटील यांचा वाढदिवस मुक बधीर विद्यार्थी यांच्या समवेत पंढरपूर येथे साजरा करण्यात आला.भारतीय मजदूर संघाचे त्रिवार्षिक अधिवेशन पंढरपूर येथे आयोजित केले होते या अधिवेशनाच्या आयोजनासाठी सुरेश पाटील हे पंढरपूर येथे आपल्या वाढदिवसाच्या दिवशी उपस्थित होते.त्या निमित्ताने त्यांनी पंढरपूरच्या पांडुरंगाचे दर्शन घेऊन पंढरपूर येथील वै.रखुमाबई भीमराव शिंदे या मूकबधिर वस्तीगृहातील




विद्यार्थ्यांना आपल्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्याचे वाटप व रोख रक्कम देणगी म्हणून दिली. सुरेश पाटील हे श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग जासई या शाळेचे शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष असून ते या विद्यालयात शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी वही व पेन भेट वस्तू देऊन विद्यार्थ्यांचा वाढदिवस शाळेत साजरा करतात.या कार्यक्रमात रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नुरा शेख, डी.पी सोनवणे, मधुकर पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.त्यांच्या या सेवाभावी व स्तुत्य उपक्रमाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# प्रा. डॉ. रामदास तोंडे यांना महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी पुरस्कार.

वादळवार्ता/किल्ले धारूर
धारूर तालुक्यातील सोनीमोहा येथील भुमीपुत्र व वसईच्या संत गोन्सालो गार्सिया महाविद्यालयाचे हिंदी विभाग अध्यक्ष डॉ. रामदास नारायण तोंडे यांना महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीचा काका कालेलकर रौप्य पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्यांचे हिंदीतील बहुचर्चित आत्मकथन 'सफर में धूप तो होगी' साठी त्यांना हा बहुमान मिळाला आहे.



महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीचा सन् २०२३/२४ या वर्षाचा पुरस्कार सोहळा सोमवार दिनांक ११ मार्च, २०२४ रोजी चर्चगेट, मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता. या भव्य समारंभात अकादमीचे कार्याध्यक्ष डॉ. शितला प्रसाद दुबे व अकादमीचे सन्माननीय सदस्य यांच्या शुभ हस्ते डॉ.रामदास तोंडे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. २५ हजार रक्कम, सन्मान चिन्ह आणि सन्मान पत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

# ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी यशवंतराव चव्हाण यांचे योगदान मोलाचे-प्रा. गणेश पोकळे



**वादळवार्ता/ बीड**
बीड, दि .12 (प्रतिनिधी) महाराष्ट्र राज्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी ग्रामीण भागात उद्योग सुरू करून शेती आणि उद्योगांची सांगड घालत, शहरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा समतोल व्हावा. कामानिमित्त शहराकडे जाणा-या लोकांचा ओढा थांबवण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांनी ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना राबवून केलेले कार्य मोलाचे आहे. असे प्रतिपादन कै. आण्णासाहेब पाटील सेवाभावी संस्थाचे सचिव प्रा. गणेश पोकळे यांनी केले. येथील वसंतराव काळे कॉलेज ऑफ जर्नालिजम अँड कॉम्प्युटर सायन्स बीड. या महाविद्यालयात महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रा. गणेश पोकळे बोलत होते. या कार्यक्रमाला प्र.प्राचार्य बप्पासाहेब हावळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना प्रा. पोकळे म्हणाले की, यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून राज्याच्या विकासासाठी केलेले कार्य मोलाचे आहे. त्यांनी ग्रामीण भागातील शेती हा आर्थिक उत्पन्नाचा मुख्य घटक आहे. हे समोर ठेवून अविकसित भागात विकासासाठी त्यांनी संयुक्त औद्योगिक क्षेत्राची कल्पना मांडली. शेतीला मुबलक पाणी मिळण्यासाठी नद्यांवर धरणे बांधल्याने विस्थापित होणाऱ्या लोकांचे पुनर्वसन झाले. खऱ्या अर्थाने तेंव्हा पासून शेती विकासाला चालना मिळून ग्रामीण विकासाला गती मिळाली. असेही प्रा. गणेश पोकळे म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्र. प्राचार्य बप्पासाहेब हावळे यांनी केले, तर शेवटी आभार कार्यक्रमाधिकारी प्रा. भूषण मठपती यांनी मानले. कार्यक्रमाला प्रा.राजश्री महाजन, प्रा. शिवशंकर पटवारी, प्रा. सुहास गाढवे, महेश नेवडे, प्रवीण उंदरे, दीपक जाधव, सचिन चौरे ,सौ. खोसे, व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरुन बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )